(संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी)

रयत शिक्षण संस्थेचे,

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा

पाहिजेत

दिनांक -०१.११.२०२६

रयत शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सातारा येथील महाविद्यालयातील वित्त अधिकारी, कनिष्ट लिपिक, प्रयोगशाळा सहाय्यक, वर्कशॉप इन्स्ट्रक्टर या पदांसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. भरण्यात येणाऱ्या पदांचा तपशील खालील प्रमाणे.

अ. क्र.	पदाचे नाव	एकूण पदे	शैक्षणिक अर्हता	इतर शैक्षणिक व अनुभव
१	**Finance Officer** (वित्त अधिकारी)	१	मान्यताप्राप्त विद्यापीठातून वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवी (किमान ५५% गुणांसह), व Chartered Accountant पदवी.	शैक्षणिक संस्था, विद्यापीठ किंवा नामांकित संस्थेमध्ये वित्त व लेखा किंवा प्रशासन विभागात किमान ५ वर्षाचा संबधित अनुभव आवश्यक, लेखांकन, अर्थसंकल्प लेखापरीक्षण, करप्रणाली, GST, TDS, PF, वित्तीय व्यवस्थापन यांचे ज्ञान आवश्यक. Tally / ERP, MS Excel आणि इतर Accounting Software मधील ज्ञान आवश्यक.
२	**Junior Clerk** (कनिष्ट लिपिक)	४	१. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी २.इंग्रजी टायपिंग – ४० शब्द प्रति मिनिट (WPM) किंवा मराठी टायपिंग – ३० शब्द प्रति मिनिट (WPM) ३. MS-CIT किंवा तत्सम संगणक अर्हता	MS Word, MS Excel, MS Power Point ई-मेल, इंटरनेट आणि कार्यालयीन कामकाजाच्या सामान्य पद्धतीने ज्ञान. मराठी व इंग्रजी भाषेतील संवाद, अभिलेख जतन, फायलिंग, अनुक्रमणिका आणि डेटा एन्ट्री यांचे ज्ञान. संबधित किंवा प्रशासकीय अनुभवास प्राध्यान्य दिले जाईल.
३	**Lab Assistant** (प्रयोगशाळा सहाय्यक) **विभाग** -१.कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग २.सिव्हील इंजिनिअरिंग ३. मेकॅनिकल इंजिनिअरिंग ४. आर्टिफिशियल इंटेलिजन्स ॲण्ड डेटा सायन्स	५	मान्यताप्राप्त विद्यापीठ / MSBTE / संबधित शाखेतील अभियांत्रिकी क्षेत्रातील पदवी किंवा पदविका.	प्रयोगशाळेतील उपकरणे, साधने, संगणक प्रणाली, प्रयोगशाळेची देखभाल, साठा व उपकरणाच्या नोंदी आणि सुरक्षिततेच्या कार्यपद्धती यांचे व्यवहारीक ज्ञान तसेच प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिकांमध्ये मदत करण्याचे कौशल्य आवश्यक. अभियांत्रिकी महाविद्यालय किंवा तांत्रिक संस्थेतील संबधित कामाचा अनुभव असलेल्यांना प्राध्यान्य दिले जाईल.
४	**Workshop Instructor** १.मशिनिसस्ट /सीएनसी ऑपरेटर २.कारपेंटर ३.वेल्डर	२	संबधित ट्रेडमधील अभियांत्रिकी पदविका / आयटीआय – संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य	संबधित वर्कशॉपला लागू असलेल्या वर्कशॉपमधील साधने, यंत्र सामग्री, उपकरणे, फिटिंग, फब्रिकेशन आणि देखभाल कामाचे व्यावहारिक ज्ञान. कार्यशाळेतील सुरक्षितता, साधने / उपकरणांची देखभाल आणि स्टॉक नोंदीचे ज्ञान. अभियांत्रिकी महाविद्यालय / पॉलिटेक्निक/ औद्योगिक संस्थेतील संबधित अनुभवाला प्राधान्य

वरील पदांचे वेतन रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयाच्या धोरणाप्रमाणे देण्यात येईल.

भरवायच्या पदांसाठी आवश्यक कौशल्ये –

१.वित्त अधिकारी (Finance Officer)

- वित्तीय व्यवस्थापन आणि लेखा तत्वांचे सखोल ज्ञान
- वार्षिक अंदाजपत्रक, वित्तीय विवरणपत्रे आणि एमआयएस अहवाल तयार करण्याचे ज्ञान
- टॅली / ईआरपी / अकाउंटींग सॉफ्टवेअर आणि प्रगत एमएस एक्सेलचे ज्ञान
- जीएसटी, टीडीएस, आयकर, पीएफ, वैधानिक देयके आणि इतर लागू वित्तीय अनुपालनाचे व्यावहारिक ज्ञान
- अंतर्गत लेखापरीक्षण, वैधानिक लेखापरीक्षण आणि वित्तीय नियंत्रण कार्यपद्धतींचे ज्ञान
- वित्तीय नोंदी, व्हाउचर्स, बिले खातेवही आणि ताळमेळ हाताळण्याची क्षमता.
- उत्तम विश्लेषणात्मक, सवांद आणि निर्णयक्षमता कौशल्ये.
- व्यवस्थापन, लेखापरीक्षक, बँका, सरकारी विभाग आणि इतर वैधानिक प्राधिकरणाशी समन्वयक साधण्याची क्षमता.

२.कनिष्ट लिपिक (Junior Clerk)

- वाचन आणि इंग्रजी संवाद कौशल्ये
- कार्यालयीन कामकाजाच्या सर्वसाधारण पद्धतींचे ज्ञान.
- अभिलेख जतन (रेकॉर्ड कीपिंग) पद्धती – फाईलिंग, अनुक्रमणिका तयार करणे.
- MS Word, MS Excel, MS Power Point, ई-मेल, इंटरनेट मधील मुलभूत ते मध्यम स्तरावरील संगणक कौशल्य

३. प्रयोगशाळा सहाय्यक (Lab Assistant)

- संबधित अभियांत्रिकी / तंत्रज्ञान क्षेत्राचे सखोल व्यावहारिक ज्ञान
- प्रयोगशाळेतील उपकरणे आणी साधनांच्या हाताळणीचे व कार्यपद्धतीचे ज्ञान
- प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिकांच्या वेळी प्राध्यापक आणि विद्यार्थांना मदत करण्याची क्षमता
- प्रयोगशाळेतील सुरक्षिततेच्या नियमांचे आणि उपकरणे सुरक्षितपणे हातळण्याचे ज्ञान
- प्रयोगशाळेतील साठा नोंदवही, साहित्य वाटप / परतावा नोंदी आणि उपकारणांच्या नोंदी अद्यावत ठेवण्याचे ज्ञान
- किरकोळ बिघाड ओळखण्याची आणि दुरुस्ती व देखभालीसाठी समन्वय साधण्याची क्षमता
- शिस्तप्रियता, तसेच उतम संवाद आणी सांघिक कार्य, कौशल्ये.

४. वर्कशॉप इन्स्ट्रक्टर (Workshop Instructor)

- वर्कशॉप संबधित साधने, यंत्रसामग्री आणि उपकारणांचे सखोल व्यावहरिक ज्ञान
- फिटिंग, फब्रिकेशन, मशिनिग आणि इतर संबधित कार्यशाळा – विषयक कार्यपद्धतीचे ज्ञान
- वर्कशॉपमधील यंत्रसामग्री आणि उपकरणे चालवण्याची व त्यांची देखभाल करण्याची क्षमता
- प्रतिबांधत्म्क देखभाल आणि प्राथमिक दोष – निवारणाचे ज्ञान
- वर्कशॉपमधील सुरक्षा नियम आणि कार्यपद्धतीचे ज्ञान
- साठ्याची देखभाल, साहित्य देणे / परत घेणे आणि देखभालीच्या नोंदी ठेवण्याचे ज्ञान
- वर्कशॉपमधील प्रात्यक्षिकांच्या वेळी प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांना मदत करण्याची क्षमता

अटी आणि शर्ती

१. आवश्यक शैक्षणिक पात्रता, अनुभव, वेतनश्रेणी इत्यादी बाबी रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी विहित केलेल्या नियमांनुसार असतील.
२. उमेदवारांनी आपला तपशीलवार अर्ज, बायोडाटा, अनुभव, शैक्षणिक कागदपत्रे आणि बायोडाटा मध्ये नमूद केलेली पूरक कागदपत्रे यासह **https://kbpnt.rayatrecruitment.com** या संकेतस्थळावर विहित मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज करावा.
३. अंतिम मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.
४. मुलाखतीच्या वेळी मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत.
५. सदर भरती प्रक्रीयेमध्ये रिक्त पदांची संख्या कमी जास्त करणे, परीक्षेचे स्वरूप, भरती प्रक्रियेत बदल करणे अथवा इतर बाबतचे अधिकार संस्थेकडे राहतील.

परीक्षेचे स्वरूप – Online / Offline परीक्षा

पद क्र. १. वित्त अधिकारी (Finance Officer)

- लेखी परीक्षा – १०० गुण (बहुपर्यायी प्रश्न परीक्षा ७५ गुण + टायपिंग – २५ गुण)
- मुलाखत – ५० गुण
- एकूण - १५० गुण

पद क्र. २.कनिष्ट लिपिक –

- लेखी परीक्षा – १०० गुण (बहुपर्यायी प्रश्न परीक्षा ७५ गुण + टायपिंग – २५ गुण)
- मुलाखत – ५० गुण
- एकूण - १५० गुण

पद क्र. ३. लॅब असिस्टंट –

- लेखी परीक्षा – १०० गुण (बहुपर्यायी प्रश्न परीक्षा ७५ गुण + टायपिंग – २५ गुण)
- मुलाखत – ५० गुण
- एकूण - १५० गुण

पद क्र. ४. वर्कशॉप इन्स्ट्रक्टर –

- लेखी परीक्षा – १०० गुण (बहुपर्यायी प्रश्न परीक्षा ७५ गुण + टायपिंग – २५ गुण)
- मुलाखत – ५० गुण
- एकूण - २०० गुण

ऑनलाईन अर्ज भरणेबाबतच्या सूचना –

- **https://kbpnt.rayatrecruitment.com** या संकेतस्थळावर जावे
- Registration या लिंकवर क्लिक करावे.
- तपशीलवार सर्व माहिती भरावी तदनंतर Submit Button वर Click करावे.
- Registration यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर अर्जात दिलेल्या मोबाईल नंबरवर युजर नेम आणि तुम्ही नमूद केलेला पासवर्ड येईल.
- युजरनेम आणि पासवर्ड पुन्हा Login करावे.
- उमेदवाराचा पत्ता, कामाचा अनुभव व शैक्षणिक पात्रतेबाबतची सविस्तर माहिती जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे भरावी.
- उमेदवाराचा फोटो व सही Upload करावी.

ऑनलाईन अर्ज शुल्क

- फॉर्म फी रु. ६००+ बँक चार्जेस Online भरावेत आणि पुन्हा एकदा अर्ज बरोबर भरलेला आहे की नाही याची खात्री करून काही दुरुस्ती असल्यास ती करावी व त्यानंतर Submit हे बटन दाबावे. एकदा हे बटन दाबल्यानंतर पुन्हा अर्जात दुरुस्ती करता येणार नाही. याची दक्षता घ्यावी.
- प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज भरणे आवश्यक आहे, प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र फॉर्म फी भरावी लागेल.

महत्त्वाच्या तारखा-

जाहिरात प्रसिद्ध तारीख	- ०१.११.२०२६
ऑनलाईन अर्ज सुरु होण्याची तारीख	- ०२.११.२०२६
ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख	- १६.११.२०२६
ऑनलाईन फी भरण्याची अंतिम तारीख	- १६.११.२०२६

सचिव
रयत शिक्षण संस्था, सातारा

ठिकाण – सातारा